" प्रेस नोट "                    दिनांक ०७/०८/२०२६

# साकीनाका पोलीस ठाणे, मुंबई कडुन अभिलेखावरील सराईत गुन्हेगाराविरोधात एम.सी.ओ.सी. (मोक्का) अंतर्गत कारवाई केले बाबत.

तक्रारदार जावेद पटेल यांनी साकीनाका पोलीस ठाणेस येवुन तक्रार दिली होती की, अभिलेखावरील आरोपी इस्त्राईल इस्माईल खान व त्याचे साथीदार यांनी तक्रारदार यांच्या ऑफिसमध्ये घुसुन तक्रारदार व त्यांचे सहकारी झाकीर शेख यांना शिवीगाळ व हाताने मारहाण करून चाकुचा धाक दाखवुन टेबलल्या ड्रॉव्हरमधील ४५ हजार रूपये रोख रक्कम घेतले. तसेच तक्रारदार यांच्या फोन पे ॲप वरून जबरदस्तीने ७५ हजार रूपये ऑनलाईन पध्दतीने ट्रान्सफर करून घेतले तसेच तक्रारदार यांच्या मदतीसाठी आलेल्या लोकांनासुध्दा वरील आरोपीत इसम व त्याचे साथीदार यांनी जीवे ठार मारण्याची धमकी दिल्याबाबत तक्रारदार जावेद पटेल यांच्या फिर्यादीवरून साकीनाका पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ६६८/२६ कलम ३०९(६), ३३३, ११५(२), ३५२, ३५१(२), ३ (५) भा.न्या.संहिता सह कलम ३७(१)(अ),१३५ मपोका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

साकीनाका पोलीस ठाणे अभिलेखावरील सराईत गुन्हेगार नामे इस्त्राईल इस्माईल खान वय ३० वर्षे, हा स्वत: संघटीत गुन्हेगारी टोळी चालवित असुन त्याने त्याचे टोळीतील इतर सदस्यांनी साकीनाका पोलीस ठाणे हद्दीमध्ये तसेच मुंबई शहरामध्ये मध्ये शस्त्रांचा वापर करून स्वत:ची दहशत बसवण्याकरीता आणि टोळीचे वर्चस्व टिकवण्याकरीता बळाचा वापर करून स्वत:साठी व संघटीत टोळीच्या इतर सभासदांसाठी गुन्हे केले आहेत. सदरचा आरोपी व त्याच्या टोळीतील सदस्य मुंबई व मुंबई परिसरात गुन्हे करून परराज्यात जात होते.

नमुदचा गुन्हा दाखल झाल्यानंतर साकीनाका पोलीस ठाणेतील अधिकारी व अंमलदार यांची पथके तयार करून आरोपीताचा शोध घेणे चालु होते. तपासादरम्यान तांत्रिक तपास व गुप्त बातमीदार यांच्याकडुन माहिती प्राप्त करून सदर आरोपीत हा बंगलुरू, कर्नाटक याठिकाणी असल्याची माहिती प्राप्त झाल्यावरून साकीनाका पोलीस ठाणेचे अधिकारी व अंमलदार यांनी सदर ठिकाणी जावुन सापळा रचुन आरोपीतास शिताफीने ताब्यात घेवुन नमुद गुन्हयात अटक करण्यात आलेली आहे. नमुद गुन्हयातील पाहिजे आरोपीतांना अटक करीत आहोत.

साकीनाका पोलीस ठाणे हद्दीत व लगतच्या परिसरात त्याच्या संघटीत टोळीचे वर्चस्व वाढविण्याकरीता संघटीत टोळीतील सदस्यांच्या सहाय्याने धारधार शस्त्राचा धाक दाखवुन जबरीने लुटमार,खुन, खुनाचा प्रयत्न, मृत्यु तसेच दुखापतीची भीती दाखवुन खंडणी मागणे, जबरी चोरी अशा प्रकारचे गुन्हे केलेले आहेत. त्याच्या संघटीत गुन्हेगारी टोळीद्वारे तो अशाप्रकारे सातत्याने करीत असलेल्या संघटीत गुन्हेगारी कृत्यांना आळा घालण्याकरीता साकीनाका पोलीस ठाणे येथे दाखल गु.र.क्र. ६६८/२६ या गुन्हयात मोक्का कायद्यामधील कलम ३(१)(ii), ३(२), ३(४) महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा, १९९९ अंतर्भाव करण्यात आला आहे.

**इस्त्राईल इस्माईल खान वय ३० वर्षे, याचेविरूध्द दाखल गुन्हे अभिलेख खालील प्रमाणे:-**

१) साकीनाका पो ठाणे गु.र.क्र.९१/१३, कलम ३२४,३४ भादवि
२) घाटकोपर पो ठाणे गु.र.क्र.३६०/१४, कलम ३२६,५०४ भादवि
३) घाटकोपर पो ठाणे गु.र.क्र.४२०/१५, कलम ३२६, ३२३,५०४, ५०६(२),३४ भादवि
४) साकीनाका पो ठाणे गु.र.क्र.७३३/१५, कलम ३८७,३४१ भादवि
५) घाटकोपर पो ठाणे गु.र.क्र.१२६/१६कलम ३८७, ५०६(२),३२३,५०४,३४ भादवि सह कलम ४,२५ भा.ह.का.
६) घाटकोपर पो ठाणे गु.र.क्र.३७२/१६, कलम ३०७, ३८७, ३४१,३२३,५०४,५०६(२), ३४ भादवि सह कलम ३,२५, ४,२५ भा.ह.का.

७) एम.आर.ए पोलीस ठाणे गु.र.क्र.५०७/२१, कलम ३०२, ३०७, १४३,१४४,१४७,१४८,१४९,३४ भादवि सह कलम ३७(१) सह १३५ मपोका

८) साकीनाका पो ठाणे गु.र.क्र.५४४/२१, कलम ३२७, ३२४, ३२३, ५०४, ५०६(२), ३४ भादंवि

९) घाटकोपर पो ठाणे गु.र.क्र.५५९/२१, कलम ३२६, ५०४, ५०६ (२), ३४ भादवि सह ३७ (१) सह १३५ म.पो. का.

१०) साकीनाका पो ठाणे गु.र.क्र.६५६/२०२१, कलम ३२४, ३२३, ५०४, ५०६, ३४ भादंवि

११) साकीनाका पो ठाणे गु.र.क्र.४२०/२३, कलम ३९४, ३२४, ४२७, ५०४, ३४ भादवि

१२) साकीनाका पो ठाणे गु.र.नं.७१९/२३ कलम ३५४,३५४(ब), ३२४,३२३,५०४,५०६(२) भा.द.वि.

१३) साकीनाका पो ठाणे गु.र.क्र.४३४/२४ कलम ३५३, ३३३, ३२३, ५०४, ५०६(२), ३४ भादवि सह कलम ३७(१)(अ),१३५ मपोका

१४) साकीनाका पो ठाणे गु.र.नं.५९५/२४ कलम ३०९(४), ३०८(५), ११२(२), ३(५) भा.न्या.सं.

१५) साकीनाका पो ठाणे गु.र.क्र.७०९/२५ कलम ३०९(६), ११५(२),३५१(३),३५२,३(५) भा.न्या.स सह कलम ३७(१), (अ), १३५ मपोका

१६) साकीनाका पो ठाणे गु.र.क्र. ९०८/२५ कलम ३०९(६), ३०८,३५१(३), ११५(२), ३५२, ३५१(२), ३(५) भा.न्या.संहिता सह कलम ३७(१)(अ), १३५ मपोका

१७) साकीनाका पो ठाणे गु.र.क्र. ६४८/२६ कलम ११८(२), ११५(२),३५१(२),३५२, ३(५) भा.न्या. संहिता

१८) साकीनाका पो ठाणे गु.र.क्र.६६८/२६, कलम ३०९(६), ३३३,११५(२),३५२,३५१(२),३(५) भा. न्या.संहिता सह कलम ३७(१)(अ),१३५ मपोका

**इस्त्राईल इस्माईल खान वय ३० वर्षे, याचेविरूध्द यापुर्वी करण्यात आलेली प्रतिबंधक कारवाई खालीलप्रमाणे :-**

१) घाटकोपर पोलीस ठाणे सन २०१३ मध्ये फौ.दं.प्र.सं. कलम १०७ अन्वये कारवाई करण्यात आली.

२) घाटकोपर पोलीस ठाणे सन २०१६ मध्ये फौ.दं.प्र.सं. कलम ११० अन्वये कारवाई करण्यात आली.

३) घाटकोपर पोलीस ठाणेकडुन सन २०१७ मध्ये एम.पी.डी.ए. अन्वये एक वर्षे कालावधी करीता स्थानबध्द कारवाई करण्यात आली होती.

४) साकीनाका पोलीस ठाणेकडुन कलम ५५ मपोका अन्वये हद्दपार आदेश क्र.०९/सी/४३/परि-१०/२४, दिनांक २०/०१/२४ अन्वये एक वर्षाकरीता हद्दपार करण्यांत आले.

**साकीनाका पोलीस ठाणेचे वर नमुद गुन्ह्याचे दाखल अधिकारी,गुन्हे प्रकटीकरणी अधिकारी, तडीपार अधिकारी व अंमलदार यांनी अभिलेखावरील सराईत आरोपीताविरोधात महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण (एम. सी.ओ.सी.ए.) कायदयातंर्गत कारवाई करण्याची उल्लेखनीय कामगिरी पार पाडलेली आहे.**

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई श्री. देवेन भारती सो., मा. पोलीस सह आयुक्त, का.व सु. बृहन्मुंबई डॉ. श्री. मनोजकुमार शर्मा, मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग डॉ. श्री. अभिनव देशमुख, पोलीस उप आयुक्त, पश्चिम परिमंडळ ०३, मुंबई श्री. दत्ता नलावडे यांचे मार्गदर्शनाखाली तसेच सहायक पोलीस आयुक्त, साकीनाका विभाग, श्री. दादासाहेब घुटूकडे यांच्या देखरेखीखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक साकीनाका पोलीस ठाणे श्री. अविनाश मांदळे, पोलीस निरीक्षक नितीन पाटील, सपोनि किशोर मेढे, सपोनि नेत्रा मुळे, पो.उप.नि. खलील शेख, पो.ह.क्र.०९.११५५/अर्चना रेडेकर, पो.शि.क्र.१३०३५२/ अरूण बोडके व पो. शि.क्र. १३०५८३/ बालाजी भुरे यांनी पार पाडली आहे.